**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाच्या परीक्षा विभागाशी संबंधित डाक यापुढे परीक्षा विभागात स्वीकारल्या जाणार**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, अभ्यागत, पालक आणि सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून विद्यापीठ अध्यादेश क्र. २१/२००१ मधील पार्ट-बी (१) चे अधिन राहून नियमित, माजी, बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संबंधित महाविद्यालयामार्फतच परीक्षा विभागाच्या आवक शाखेमध्ये स्वीकारल्या जाणार आहेत. तसेच पीएच.डी. शी निगडीत डाक, डेझरटेशन्स आदी देखील परीक्षा विभागाच्या आवक शाखेमध्येच स्वीकारल्या जातील.

यापूर्वी सर्व डाक विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील केंद्रीय आवक शाखेत स्वीकारल्या जात होती, परंतू आता फक्त परीक्षेविषयक सर्व डाक परीक्षा विभागातील आवक शाखेत स्वीकारल्या जाणार आहे. विद्यापीठातील इतर सर्व विभागांशी संबंधित डाक केंद्रीय आवक शाखेत स्वीकारण्याची व्यवस्था कायम ठेवण्यात आली आहे.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी व परीक्षेविषयक डाक परीक्षा विभागातील आवक शाखेमध्ये देण्याची व्यवस्था करावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी परिपत्रक क्र. १/२०१९ अन्वये कळविले आहे.

---

प्रति,                                                                 **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                          दि. २५/०७/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी